## ॥ श्रीः ॥

(ह्या लेखाचा काही अंश 'दैनिक सनातन प्रभात'च्या ख्रिस्ताब्द ११ जानेवारी, २०१५ च्यान अंकात प्रसिद्ध झाला आहे.)

ख्रिस्ताब्द २९ डिसेंबर, २०१४ रोजी 'झी २४ तास' या मराठी वृत्तवाहिनीवरील 'रोखठोक' मध्ये " औरंगाबाद येथे भरलेल्या ज्योतिषांच्या संमेलनात नारायण नागबली व कालसर्पशांती असे योग संमेलनात उपस्थित ज्योतिषींना मान्य नसल्याचे व असे विधी करण्यास ज्योतिषशास्त्रानुसार कोणताही आधार नाही." असे संमेलनाध्यक्ष श्री. नंदकुमार जकातदार यांनी संमेलनात जे विधान केले त्या विषयावर चर्चा ठेवली होती. या चर्चेकरिता स्वतः श्री. नंदकुमार जकातदार (जे एका ज्योतिष मुक्त विद्यालयाचे कुलपति आहेत.) , सामाजिक कार्यकर्ते श्री. कुमार सप्तर्षि, पंचांगकर्ते व खगोल अभ्यासक श्री. दा.कृ.सोमण व श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील पुरोहित श्री. राजीव दीक्षित यांना आमंत्रित केले होते व या चर्चेचे सूत्रसंचालन 'झी २४ तास' या मराठी वृत्तवाहिनीचे प्रमुख संपादक श्री. उदय निरगुडकर यांनी केले. चर्चा करण्यात काही गैर नाही असे जरी असले तरी या कार्यक्रमातील काही आक्षेपार्ह विधाने व त्यांचे वास्तव सांगतो आहे. जिथेजिथे वेळा दिलेल्या आहेत त्या 'यु-ट्यूब' वरून डाऊनलोड केलेल्या कार्यक्रमातील मिनिट व सेकंद अशा आहेत. ज्यांनी हा कार्यक्रम बघितला नसेल त्यांनी 'यु-ट्यूब' ला हा कार्यक्रम बघावा म्हणजे लेखातील मतांबद्दल त्यांना विचार करणे सोपे जाईल.

(१) खरे तर चर्चेचा विषय ' नारायण नागबली व काळसर्प त्र्यंबकेश्वरी केल्यासच फल मिळते काय ?' असा किंवा ' केवळ त्र्यंबकेश्वरीच नारायण नागबली व काळसर्प करविण्यामागे ज्योतिषी व पुरोहितांचे एक मोठे रॅकेट कार्यरत आहे काय ?' अशा स्वरुपात असायला हवा होता (कारण, प्रश्न तर तसेच विचारले जात होते.) पण सरसकट ' नारायण नागबली व काळसर्प' या विधींना थोतांड ठरविल्यामुळे चर्चा महत्वाच्या मुद्द्यापासून काहीशी भरकटलेली वाटली.

pankajjoshiguruji@gmail.com संपर्क :- (022) 24311409

(२) नारायण नागबली हा विधि त्र्यंबकेश्वर शिवाय अन्य कोणत्या स्थानी करता येतो का ? का केवळ त्र्यंबकेश्वर येथेच हा विधि करावा असे शास्त्रवचन आहे ? हे सुद्धा सर्व पुरोहितांच्या चर्चेतून स्पष्ट केले पाहिजे. हा विषय कर्मकांडाचा असल्याने पंचांगकर्ते व ज्योतिषी यांनी यात ‘अव्यापारेषु व्यापार’ करू नये. (ज्योतिषांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. कारण, ज्योतिषी व पुरोहित यांच्यातील वादांचा व मतभेदांचा फायदा धर्मविरोधी व्यक्तींना आपसूकच मिळत असतो. वेदपुरुषाचे डोळे म्हणजे ‘ज्यौतिषशास्त्र’ असे पाणिनीय शिक्षादि ग्रंथांमध्ये प्रतिपादिले आहे. कर्म करतेवेळी ज्याप्रमाणे सर्व इंद्रियांचा समन्वय असणे आवश्यक आहे , तसेच ज्योतिषांचा व वेदमूर्तींचाही समन्वय असल्यास उत्तमच.) निर्णयसिंधूत पान ३७५ ते ३७७ या पृष्ठांवर श्राद्धाला योग्य देश व निषिद्ध देश (प्रदेश) सांगितले आहेत. काम्यश्राद्धाकरिता स्कंदपुराणातील

**‘सह्यस्य चोद्भवोयत्र यत्र गोदावरी नदी ।**
**पृथिव्यामपिकृत्स्नायां सप्रदेशोतिपावनः॥’**

हे वचन त्र्यंबकेश्वर येथेच नारायण नागबली इ. काम्यश्राद्धादि कर्म करावे अशा अर्थास पूरक आहे. असे असले तरीही, गोकर्ण महाबळेश्वर (कर्नाटक), हरिहरेश्वर, बाणगंगा, निर्मळ (वसई), नृसिंहवाडी अशा बऱ्याच ठिकाणी वर्षानुवर्षे हे विधि केले जात आहेत व त्या विधींचे फळसुद्धा मिळाले आहे. अर्थात, ‘स्थानमाहात्म्य’ म्हणून त्र्यंबकेश्वर सर्वोच्च ठरते याबद्दल दुमत नसावे. विधानमालेतील पुढील श्लोक स्पष्ट सांगतात की –

**गंगायां यमुनायां च पुष्करे नैमिषे तथा ।**
**कुरुक्षेत्रे सरस्वत्यां तीर्थे ऽ न्यस्मिन्शुभेऽ पि वा ॥**
**नद्यामब्धौ तडागे वा संगमे निर्झरेऽ पि वा ।**
**दाल्भ्य वै जलपूर्णे च ह्रदे वा विमले जले ॥**
**वापीकूपे गवां गोष्ठे कुंडे वा प्रतिमाश्रये ।**
**मन्नाम्ना कारयेदाद्यं बलिं नारायणं शुभम् ॥**

pankajjoshiguruji@gmail.com संपर्क :- (022) 24311409

हा नारायण बली अपमृत्यूने उद्भविलेले दोष निरसनार्थ आहे. ( त्या त्या वेळी केल्यास उत्तमच पण तेव्हा सांगणारे न मिळाल्यास, योग्य मार्गदर्शकांनी सांगितल्यावर तरी हा विधी करावा.)

(३) 'अंधश्रद्धा निर्मुलन कायद्याच्या' भीतीपोटी जर ज्योतिष परिषदेने असे विधान केले असेल तर हा त्यांचा घाबरटपणा, पळपुटेपणा असून ज्या शास्त्रामुळे त्यांना एवढे वर्षे प्रसिद्धी, पैसा, मानसन्मान इ. मिळाला त्या शास्त्राप्रति त्यांची 'कृतघ्नता'च म्हटली पाहिजे.

(४) सर्व चर्चेत 'नारायण नागबली' म्हणजे 'श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे केला जाणारा विधी' असे समजूनच विधाने होत होती. खरे तर, 'नारायण नागबली' दोन कारणाकरिता होऊ शकतो एक म्हणजे काम्य ( म्हणजे काही विशिष्ट कामनेनी उदा. संतती न होणे, गृहसौख्याचा अभाव, कष्ट करूनसुद्धा आर्थिक प्रगती न होणे इ., जो ज्योतिषी सुचवितात व प्रामुख्याने श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे केला जातो.) व दुसरा म्हणजे अंत्यसंस्कारांग. (चांडाळ,उदक,सर्प,ब्राह्मण,वीज, दाढा असलेले पशू, रज्जू,शस्त्र, विष, पाषाण यांनी मृत; देशांतरी मृत, इतर साधनांनी मृत,जीवंतश्राद्ध करून मृत, कनिष्ठ मृत, संन्याशी मृत यांचे पुण्योत्पत्तिकरिता व पातकनाशाकरिता बाराव्या दिवशी अथवा वर्षांती द्वादशीस श्रवण नक्षत्रावर, पंचमीस किंवा पर्वावर नारायणबली करावा.) याचा खुलासा चर्चेत झालाच नाही.

(५) वर उल्लेख केलेल्या दुसऱ्या प्रकारच्या नारायणबलीचा उल्लेख व विधि निर्णयसिंधू या ग्रंथात पान ५५७ ते ५६२ क्रमांकांच्या पृष्ठांवर दिला आहे. याच निर्णयसिंधूत ' जो अविचारी मनुष्य पतितांची दाहादि कर्मे करितो त्याची शुद्धि दोन तप्तकृच्छ्रांनी होते.' अशी व यासारखी ' पतित व आत्मघातक्यांचे दाहादि संस्कार करू नयेत.' अशा अर्थाची भरपूर प्रमाणवाक्ये आहेत. न झालेल्या अंत्यक्रियेमुळे भविष्यात उद्भविणारे अथवा सध्या होत असलेले त्रास दूर करण्याकरितासुद्धा काम्य 'नारायण नागबली' करावा लागतो.

(६) पान ५५२ वर खालून पाचव्या ओळीत ‘सर्पाने दंश करून मृत असता नागबली करावा.’ असे स्पष्ट वचन आहे.

(७) पान ५५७ वर छागलेय हा आचार्य यम ह्या स्मृतिकाराचे मत स्पष्टपणे सांगतो , ‘ लोकापवादाच्या भीतीने मनुष्यांनी नारायणबली करावा. तसे केले असता त्याची शुद्धता होते अन्यथा शुद्धि होत नाही.’ ( केवळ पहिलेच वाक्य वाचले व पुढचे वाचले नाही तर या विधीच्या विरोधकांना आयतेच फावेल.)

(८) व्यास, षट्त्रिंशन्मतकार, हेमाद्रि, बोधायन, स्मृतिरत्नावली इ. ग्रंथकारांनी सुद्धा आत्मघातानंतर नारायणबली करावा असे सांगितले आहे.

(९) पान ५५९ वर ‘अंत्यसंस्कार करून बहिष्कृत केलेल्यांनी सुद्धा पित्र्यादिकांचा वर्षांती नारायणबली करावा.’ असे वचन आहे.

(१०) याच पानावर खालून पाचव्या ओळीपासून पुढे हेमाद्रि इ. च्या मतानुसार नारायणबली कसा करावा याचे भाषांतर दिले आहे. अधिक विस्तृत विवरण नारायणभट्ट कृत अंत्येष्टिपद्धती नामक ग्रंथात अभ्यासावे असे सांगितले आहे. हा ग्रंथ सांप्रत उपलब्ध आहे. पुणे येथील अनमोल प्रकाशनने ‘नारायणभट्टी’ (उत्तरनारायणभट्टी व अंत्येष्टीसह) या नावाने तो प्रकाशित केला आहे.

(११) पान ५६० वर सर्प अथवा नागबलीचा विधी सांगितला आहे व पान ५६१ वर निपुत्रिकाकरितासुद्धा नारायणबली करावा असे गरुडपुराणाचे सांगणे आहे हे छापले आहे. (निपुत्रिकाच्या पुढची पिढी नसल्याने कुणाला त्रास होणार नाहीतच मग करण्याची गरज काय असा विचार न करता निपुत्रिकाकरितासुद्धा नारायणबली करावा.

(१२) पान ५६१ वर खालून दुसरी ओळ. यात ‘बौधायन’ यांनी ब्रह्मलीन संन्याश्यांकरिता बाराव्या दिवशी नारायणबली करावा असे सांगितले आहे. ५६२ व्या पानावर शौनकाने सांगितलेला नारायणबली आहे.

pankajjoshiguruji@gmail.com संपर्क :- (022) 24311409

(१३) निर्णयसिंधू ग्रंथातीलच वचने देण्यामागचे कारण असे की हा ग्रंथ 'धर्मसिंधू' च्या अगोदर रचला गेला आहे. या ग्रंथाशिवाय 'आश्वलायन गृह्यपरिशिष्ट', नृसिंहभट्टरचित 'विधानमाला', 'संस्कार रत्नमाला' यातही हा विधी दिला आहे.

(१४) या कार्यक्रमात चर्चेच्या सुरवातीला वाहिनीने विषय समजण्याकरिता जी ध्वनिचित्रफित दाखविली त्यात श्याम मानव यांनी तर 'मेलेल्या माणसाची (तरुणाची) कुंडली जिवंत तरुणीच्या कुंडलीबरोबर जुळवायला नेल्यास एकही ज्योतिषी ह्या कुंडलीचा तरुण सांप्रत जिवंत नाही हे सांगू शकत नाही.' असे सांगितले. काही प्रश्नांना उत्तरे न देता प्रतिप्रश्नानेच समस्यापूर्ती करायची असते. आम्ही मानवांना प्रतिप्रश्न करतो की, असे कोणते शास्त्र आहे ज्यात माणूस समोर नसताना तो जिवंत आहे का मेलेला आहे हे सांगता येणे शक्य आहे ? मानवांच्या या विधानानुसार तर कोणतेही शास्त्र अस्तित्वातच नाही असे म्हणावे लागेल. जन्माच्या वेळचे रिपोर्ट्स अथवा बर्थ सर्टिफिकेट दाखवून कोणत्याही आधुनिक विज्ञानाची मान्यता असणाऱ्या शास्त्रालाही असे सांगता येणे शक्य आहे काय ? म्हणून मग ते रिपोर्ट्स काढण्याची अथवा बर्थ सर्टिफिकेटची प्रक्रिया थोतांड आहे असे म्हणायचे काय ? प्रत्येक दस्तावेजाच्या मर्यादा वेगवेगळ्या असतात. ज्या ज्योतिषांनी असा दावा केला असेल त्यांनाच आव्हान द्यावे. औषधाच्या कुपीवर (बाटलीवर) 'एक्सपायरी डेट' छापलेली असते, परंतु काल या एका कारणाव्यतिरिक्त अन्य कारणांनीही औषध निष्प्रभ ठरू शकते. तसेच आयुर्मर्यादा किती असेल हे जरी अनुमान काढता आले तरी अन्य बऱ्याच घटकांनी आयुष्याचा ऱ्हास अथवा नाश सुद्धा होऊ शकतो. अंनिस च्या अशा तर्कहीन प्रश्नातूनच त्यांची 'सो कॉल्ड वैज्ञानिक' विचारसरणी कळते. वाट्टेल त्यांना उत्तरे द्यायला किंवा आव्हाने स्वीकारायला ज्योतिषी काही मूर्ख नाहीत. ज्या शास्त्राचे जे प्रयोजन आहे त्याकरीताच त्याचा वापर झाला पाहिजे. 'एक्सपायरी डेट' च्या दुसऱ्याच दिवशी त्या औषधातील औषधी तत्व नष्ट होते असे औषधतज्ज्ञ ठामपणे सांगतील काय ? होत नसल्यास हि सुद्धा लोकांची फसवणूकच नव्हे काय ? अनेक बांधकामांचे सुद्धा आयुर्मान ठरवून

तेवढ्या काळाची हमी दिली जाते, पण त्याअगोदर सुद्धा बांधकाम नष्ट अथवा भग्न होऊ शकते किंवा त्या काळानंतर सुद्धा उत्तमावस्थेत राहते. अशा वेळी कोणी फसवणूक केली असे म्हणत नाही. मग, धार्मिक बाबतीतच असा पवित्रा का ?

(१५) एका घाबरट पत्रकाराने स्वतःचा चेहरा (नव्हे, संपूर्ण शरीर) झाकून स्वतःचा अनुभव सांगितला. आश्चर्य म्हणजे त्यानी 'प्रयत्न हा अंतिम परमेश्वर असतो ' असे विधान केले. अर्थातच सर्वात शेवटचा परमेश्वर म्हणजे प्रयत्न असे म्हणून दैव त्या अगोदरचे असते हेच नकळत मान्य केले नाही का ? अशा पत्रकारांना पत्रकारिता शिकविण्याअगोदर मराठी भाषा व संभाषणकला शिकवा.

(१६) निरगुडकरांनी या कार्यक्रमाच्या प्रसारणाअगोदर दाते पंचांगकर्ते श्री. मोहनराव दातेंशी या विषयावर विस्तृत चर्चा केली असे सांगितले व दोन वेळा (०८ मि. व ४७ से. , १० मि. ५५ से.) धर्मसिंधू म्हणायच्या ऐवेजी 'जन्मसिंधू' असेही त्यांनी म्हटल्याचे आम्ही ऐकले व याच नावानी हि माहिती त्यांनी ठामपणे लोकांना सांगितली. जन्माने हिंदू असून सुद्धा ज्यांना धर्मशास्त्रावरील एका महत्वाच्या ग्रंथाचे नावसुद्धा व्यवस्थित उच्चारता येत नाही असे हे वाहिनीवरील उच्चशिक्षित संपादक जनतेची दिशाभूल कशी करीत आहेत हे आता लोकांनीच समजून घ्यावे. " काळ व सर्प ह्या दोन वेगवेगळ्या देवता असताना काळसर्प हि एकच नवीन देवता कशी आली ?"; " ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात या नारायण नागबली चा (ओघानेच कालसर्प शांतीचाही) उल्लेख नाही. (११ मि. ०५ से.)" अशी विधाने करून आपला या विषयाचा अभ्यास नसल्याचे सिद्ध केले. पहिल्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे काल अथवा काळ हे सर्पाचे विशेषण आहे. जसे काळरात्र, काळभैरव, कालपुरुष इ. हे व्याकरणाचा अभ्यास असल्याशिवाय संपादकांना माहिती असणे शक्य नाही. ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात काळसर्प शांतीचा प्रयोग नाही हे खरे असले तरी अशा अनेक शांती आहेत ज्यांचा प्रयोग ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात नाही. उदा. पुष्य,मघा, चित्रा, विशाखा, क्षयतिथी, यमघंट, कालदंड, राक्षोघ्न, विष्णुबली इ. पण यांचे विधान शांतिरत्नादि अन्य



पंकज जोशी गुरुजी

ग्रंथांमध्ये आहे. तेव्हा केवळ ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात विधान नाही म्हणून कालसर्प शांती अशास्त्रीय कशी ? ज्या ज्योतिषांचा याज्ञिकीशी दुरान्वये संबंध नाही असे ज्योतिषी बाष्कळ विधाने करून भाविकांमध्ये संभ्रम निर्माण करू पाहत आहेत. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात गर्भाधान प्रयोगानंतर नारायणबली त्यानंतर नागबली व त्यानंतर दत्तपुत्रविधान असे विषय क्रमाने आहेत. याचाच अर्थ या नारायण नागबली चा संबंध संततीप्राप्तीशी आहे असे ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयकार सुद्धा मानतात.

(१७) जकातदार म्हणाले की या योगाचा धर्मशास्त्र, निर्णयसिंधू मध्ये उल्लेख नाही. (या योगाचा म्हणजे नारायण नागबलीचा असे त्यांना अभिप्रेत असावे. त्यांनी निर्णयसिंधू या ग्रंथात ५५७ ते ५६२ क्रमांकांच्या पृष्ठांचे वाचन केल्यास त्यांना तसे उल्लेख सापडतील. कालसर्पाचा उल्लेख निर्णयसिंधूत नाही एवढ्याच कारणावरून तो अशास्त्रीय ठरत नाही. )

(१८) 'फक्त हिंदूंनीच नारायणनागबली विधी करावे हे मान्य नाही' असे जकातदार म्हणतात. (१३ मि. ३० से.) अनुभव तर असा आहे की, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी,शीख सुद्धा येऊन हा विधी करून जातात व त्यांना विधींचे फल मिळते. आता बोला ! (श्री क्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर, कर्नाटक येथे गोव्यातील अनेक ख्रिश्चन जोडपी येऊन नारायणनागबली करून गेली आहेत हे मी खात्रीने सांगू शकतो. श्री. दीक्षित गुरुजी व 'त्र्यंबक' मधील अन्य क्षेत्रोपाध्यायांकडे याहीपेक्षा आश्चर्यकारक उदाहरणे अनुभव असतीलच.)

(१९) दा.कृ.सोमण बोलण्याच्या ओघात म्हणाले की, ' गेल्या ५० वर्षापासून हे सुरु झालेले आहे.' ( १४ मि. ५६ से.) पंचांगकर्ते वर्षाचे परिमाण काय धरतात ते ठाऊक नाही, पण तीन-साडेतीनशे वर्षांपासूनचे उल्लेख आजमितीस त्र्यंबकेश्वरच्या तीर्थोपाध्यायांकडे असताना सोमणांच्या या विधानाला काडीचीही किंमत देण्याची गरज वाटत नाही.

(२०) दा.कृ.सोमणांचा विकृतपणा एवढ्या थराला गेला की, ' या विधींवर बंदी घातली पाहिजे. हे विधी करणारे (पुरोहित) गुन्हेगार आहेत.' असे म्हणण्यापर्यंत त्यांची मजल

गेली. (१५ मि. १७ से.) केवळ त्र्यंबकेश्वर येथीलच नव्हे तर समस्त पुरोहितांनी या वाक्याचा निषेध करून सोमण यांना या विधानाबद्दल जाहीर माफी मागायला लावली पाहिजे. IPC च्या कोणत्या कलमान्वये हा गुन्हा ठरतो हे जर सोमणांनी सांगितले असते तर बरे झाले असते. यात ‘ कट प्रॅक्टिस ’ चालत नसेल असे मला म्हणायचे नाही पण तेवढ्या कारणाने जर हे विधीच बंद करायचे व विधी करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवायचे तर मोठ्यामोठ्या डॉक्टरांच्या कट प्रॅक्टिसच्या बाबतीत सुद्धा हाच न्याय लावणार का ? सर्वच डॉक्टरांना प्रॅक्टिस बंद करायला लावणार का ? सर्वच डॉक्टरांना गुन्हेगार ठरविणार का ? अन्य क्षेत्रातील कटप्रॅक्टिसचे काय ?

(२१) (२१ व्या मिनिटाला) सप्तर्षि म्हणाले की, “ नागबली ज्यांचा झाला नाही ते मेले असे म्हणता येईल का ?” हे विधान एवढे असंबद्ध होते की, सूत्रसंचालकांनीच दिशा बदलली. इतर प्राण्यांना मरणाची जाणीव नसते (२२ मि. २६ से. ) असे सांगून त्यांनी स्वतःला प्राणीशास्त्रातील व प्राण्यांच्या जाणिवा ओळखण्याच्या शास्त्रातील किती माहिती आहे हे दाखविण्याचा वृथा प्रयत्न केला आहे. वास्तविक किड्यामुंग्यांना सुद्धा मरण समीप आल्याची जाणीव होत असते फक्त ते आपल्याप्रमाणे ती जाणीव व्यक्त करू शकत नाही अथवा त्यांनी व्यक्त केलीच तरी आपल्यापैकी सर्वांनाच समजते असे नाही. खाटकाकडे कोंबड्या मारल्या जात असताना धारधार सुरा पाहिल्यावर त्या कोंबड्यांना काय समजत नसेल, की आता आपले मरण जवळ आले आहे म्हणून ? उगाच वाट्टेल ते कशाला सांगायचे ? नंतर ते म्हणाले की, “ मंत्र म्हणजे ब्राह्मणांनी देवाला दिलेले आदेश आहेत.” (२२ मि. ४५ से.) वा रे वा ! सप्तर्षि तुम्हाला किती धन्यवाद द्यावे ? ब्राह्मण हे, देवास आदेश देण्याची योग्यता असणारे आहेत असे तुम्हीच मानीत आहात यापेक्षा ब्राह्मणांचे महद्भाग्य ते काय ? आदेश देणारा हा ज्याला आदेश दिला जातो त्याच्यापेक्षा वरिष्ठ असतो हे सप्तर्षिंना ठाऊक असेलच. तुम्ही ढीग म्हटले तरी आमच्या लेखी तो परमेश्वरच सर्वशक्तिमान आहे व आम्ही त्या परमेश्वराच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त आदेशाचे पालन करतो हेच सत्य आहे.

pankajjoshiguruji@gmail.com संपर्क :- (022) 24311409

(२२) (२४ मि. २९ से. ला ) निरगुडकर म्हणतात, “ नारायण नागबलीला काही धर्मामध्ये ग्रंथाचा आधार आहे.” काही धर्मामध्ये म्हणजे कोणकोणत्या धर्मात ? असे असल्यास हा विधि केवळ हिंदू धर्मियांकरिता नाही; अन्य काही धर्माच्या लोकांकरिता सुद्धा आहे हे निरगुडकरांना मान्य आहे काय ?

(२३) दा.कृ.सोमण म्हणतात (२५मि. : ४६ से.) की, “ त्र्यंबकेश्वरची सर्व माणसे पुण्यवान असली पाहिजेत. (‘कारण ते नेहमी नारायणबल्यादि कर्म करीत असतात’ असा अजब तर्क.) पण तसे दिसत नाही.” सोमणजी , त्र्यंबकेश्वरची सर्व माणसे काही पुरोहित नाहीत व सर्वच पुरोहित जे नारायणबल्यादि पितृकार्ये करतात ते स्वतःकरिता करीत नाहीत एवढे सुद्धा आपल्या लक्षात आले नाही ? या वर्षात त्र्यंबकेश्वरच्या पुरोहितांपैकी कुणी जर २५ विवाह प्रयोग चालविले तर त्या पुरोहिताची २५ लग्न झाली असेही विधान तुम्ही कराल का ? तीर्थक्षेत्रात जन्मणारे पुण्यवान असतातच पण त्याहीपेक्षा तीर्थाच्या माध्यमातून लोकांचे त्रास, अडचणी दूर करणारे पुरोहित हे जास्त समाजोपयोगी असतात हे मान्य का करीत नाही ? “अकलेपेक्षा जास्त पैसा ”, “ सिंहस्थातले मार्केटिंग ”, “गिऱ्हाईक”, “बाजार”, “कट प्रॅक्टिस” असे शब्द वापरताना आपण ज्या ज्ञातीत जन्मलो त्या ज्ञातिबांधवांना किती वाईट नजरेने पाहतो आहोत याचेही आपणाला भान नसावे हे आश्चर्यच आहे. तीर्थक्षेत्रात राहून नारायण नागबली आदि पैतृक विधि करणाऱ्या पुरोहितांची पुढची पिढी व्यसनाधीन आहे हे जाहीर करण्यामागे सोमणांचा उद्देश नक्की आहे तरी काय ? आज विविध कारणांनी होणाऱ्या पार्ट्यांमध्ये दिसणारी व्यसनाधीन तरुण मंडळी हि सर्व पुरोहितांचीच आहेत असे म्हणायचे आहे काय ? का त्यांचे तीर्थरूप (वडील) त्या त्या क्षेत्रातील पुरोहिताप्रमाणेच आहेत असे म्हणायचे आहे ? आज त्र्यंबकेश्वर मध्ये वेगवेगळ्या पाठशाळेतून उच्च वैदिक शिक्षण घेतलेल्या पुरोहितांची नवी पिढी अधिक संशोधित नारायण नागबली आदि पैतृक विधि करू लागली आहे हे कदाचित सोमणांनी पाहिले नसावे.

पं. पंकज जोशी.

(२४) जकातदारांनी म्हटले (२७मि.:३५से.) की, “ काळसर्प, साडेसाती, वास्तुदोष, नारायण नागबली, मंगळदोष, नक्षत्रशांती हे सर्व थोतांड आहे. यांचे आम्ही महाबळेश्वराच्या संमेलनाचे वेळी होमहवनाच्या कुंडात दान केलेलं होते. ” ; “ शांती करून कोणत्याही माणसाचे भविष्य बदलता येत नाही.” ; “ मानवाच्या प्रारब्धातील घटना आधी सांगता येतात, पण त्या बदलू शकतात ग्रहांच्या गोचरीप्रमाणे. ” जकातदार आपण ज्योतिषी आहात. ज्योतिषासंबंधात सांगण्याचे आपल्याला स्वातंत्र्य आहे पण मग होमकुंडातच हे विधी का केले ? होमकुंड हे काही तुम्हाला वाटते तशा दानाचे साधन नव्हे. बरे अशा दानाचा तरी कोणत्या ग्रंथात उल्लेख आहे का ? स्वतः एकादी गोष्ट ग्रंथांमध्ये नाही म्हणून अमान्य करायची व त्याच्या निषेधाकरिता कोणत्याही ग्रंथात नसलेला ‘होमकुंडात दान’ करण्याचा विधी करायचा हे थोतांड नाही का ? दान चांगल्या व्यक्तीने, चांगल्या वस्तूचे, चांगल्या व्यक्तीला, चांगल्या ठिकाणी, चांगल्या वेळी व चांगल्या उद्देशाने करावयाचे असते. हे सहा घटक लक्ष्यात ठेवा. आपण जर काळसर्प, नारायण नागबली, साडेसाती, वास्तुदोष, मंगळदोष यांचे होमकुंडात दान केले असेल तर या सर्व गोष्टी चांगल्या आहेत हे तुम्ही ओघाने मान्य केले आहे. या सर्व गोष्टी चांगल्या नाहीत म्हणून होमकुंडात दान केले असे जर तुमचे समर्थन असेल तर वाईट म्हणजे कालसर्पासारख्या दुर्योगांचा परिहार होमहवन कुंडाच्या माध्यमातूनच होतो असे तुम्हीच मान्य केले असे म्हणावे लागेल. दोन्हीपैकी काही जरी मान्य केले तरी चालेल.

“ मानवाच्या प्रारब्धातील घटना आधी सांगता येतात, पण त्या बदलू शकतात ग्रहांच्या गोचरीप्रमाणे.” हे जर तुम्हाला मान्य आहे तर “ शांती करून कोणत्याही माणसाचे भविष्य बदलता येते.” हे मान्य करणे जड का जाते ? ग्रहांचे गोचरी भ्रमण हे काय ऐन वेळेला समजत नसते ; तुमच्यासारख्या पंचागकर्त्यांनी स्पष्टग्रहांच्या गणितात गोचरी भ्रमणाची गतिसुद्धा दिलेली असते. मग अगोदर भविष्य सांगताना त्या गोचरीचा विचार करून बदलणारे भविष्यच आपल्यासारखे ज्योतिषी का

बरे सांगत नाहीत ? का भविष्यकथन चुकलेच तर द्यायला काहीतरी कारण पाहिजे म्हणून हि तरतूद करून ठेवली आहे ?

(२५) मंगळ दोष नाही, साडेसाती मान्य नाही असे जर असेल तर दाते, साळगावकर यांच्या पंचांगात मंगळ दोषासंबंधी व साडेसातीसंबंधी खुलासा का केला जातो ? त्यात तर दातेंनी मंगळ दोष नाही व साडेसाती वगैरे काही नसते असे सरसकट विधान केलेले नाही. म्हणजे दातेंना, साळगावकरांना जकातदारांचे सर्वच म्हणणे मान्य आहे असे मानावयाची गरज नाही.

(२६) हा मुद्दा वास्तुशास्त्री म्हणविणाऱ्यांनी सुद्धा लक्ष्यात ठेवावा. त्यांच्या 'वास्तुदोष' या संकल्पनेला सरसकट थोतांड म्हणणे म्हणजे वास्तुसंबंधित अनेक ग्रंथकार आचार्यांचा, तुम्हाला हि विद्या शिकविणाऱ्या गुरुजींचा व तुमचासुद्धा अपमानच वाटत नाही का ? तसे वाटत असल्यास तुम्हीसुद्धा ज्योतिष परिषदेच्या या विधानांचा निषेध करावा.

(२७) दा.कृ.सोमण तुकारामांचा अभंग सांगताना अर्धा अभंग तुकारामाच्या शब्दात सांगून मध्येच गद्यात सांगू लागले. आपल्याला अभंग पूर्ण येत नसेल अथवा आठवत नसेल तर असे अर्धवट संदर्भ कशाला द्यायचे ? अभंगाचा भावार्थ सांगितला असता तरी काम झाले असते. ( " नवसे पुत्रप्राप्ती होती तर मग नवऱ्याची जरुर काय ?" – सोमण महाराजांचा धेडगुजरी अभंग. मूळ अभंग असा आहे - नवसे कन्या पुत्र होती । तर का करणे लागे पति । सोमणांनी 'कन्या' पद अभंगातून काढून टाकले आहे. तुकारामबोवांच्या अभंगातील कन्यापदपात करणाऱ्या सोमणांना कन्यांविषयी एवढा तिरस्कार का ? महिला मुक्ती संघटना वाल्या महिलांनो या 'वैज्ञानिक दृष्टिकोन' असणाऱ्यांचे कुविचार आपण पाहत आहात ना ? व तुकारामबोवांच्या भक्तांनो तुमच्या बोवांच्या अभंगात घुसडखोरी करणारे हे कर्मकांडी,पुरोहित लोक नसून 'वैज्ञानिक दृष्टिकोन' असल्याचे भासविणारे लोकच आहेत कळले ? आता तरी जागे व्हा. ) सप्तर्षींच्या तार्किक विचारांनीच सोमणांच्या विधानाला उत्तर द्यायचे तर, कन्या पुत्र होण्याकरिता पती करावा लागतो हे तुकारामबोवांचे म्हणणे सद्यकाळात (विज्ञानयुगात)



पंकज जोशी.

विज्ञाननिष्ठ म्हणविणाऱ्या 'सो कॉल्ड' वैज्ञानिक विचारसरणीच्या सोमणांना कसे काय मान्य होते ? एक म्हणजे पती न करता सुद्धा कन्या पुत्र होऊ शकतात व दुसरे म्हणजे पती करून सुद्धा कन्या पुत्र होऊ न शकणारी दाम्पत्ये सांप्रत शेकडो आहेत व त्यांच्याकरिताच IVF सेंटर्स आहेत. ज्यांचे करायचे काय ? असा प्रश्न निरगुडकरांनी कार्यक्रमादरम्यान विचारला होता.

(२८) " पुरोगामी महाराष्ट्राला अशी माणसं, अशी क्षेत्रं लोकांना फसवून नादी लावताहेत." (३२:४८) हा खरे तर, संपूर्ण त्र्यंबकेश्वर क्षेत्राचा अपमान आहे. हे वाक्य उच्चारून सर्व गावकऱ्यांचा घोर अपमान केल्याबद्दल सोमणांकडून जाहीर माफी घेतली पाहिजे. न घेतल्यास गावकऱ्यांना सोमणांचे हे विधान मान्य आहे असे समजावे लागेल.

(२९) " गायनॅकॉलॉजी डिपार्टमेंट मध्ये एक असं शास्त्र उघडूया. ; या शाखेत अनेक विद्यार्थिनि असतील, होणारे डॉक्टर असतील, कुमार सप्तर्षिंसारखे असतील डॉक्टर वगैरे त्यांना आपण काळसर्प विधी करायलाही शिकवू." उदयजी, अनेक विद्यार्थिनी असण्याला आपले प्राधान्य आहे हे चांगलेच आहे, पण पौरोहित्य व ते सुद्धा नारायण नागबली सारखे पितृकर्म करणे हे तुम्हाला वाटते तितके सोप्पे कार्य नाही. जितके श्रम गायनॅकॉलॉजिस्ट होण्याकरिता लागतात, तितकेच उत्तम पौरोहित्य करण्यास लागत असतात. कोणत्याही व्यवसायास, वृत्तीस कमी लेखू नये.

(३०) दा.कृ.सोमण हे पंचांगकर्ते आहेत असे म्हणतात परंतु, यांचे नवीन वर्ष १ जानेवारी पासून चालू होत आहे असे त्यांनीच कार्यक्रमाच्या शेवट सांगितले.(३३ मि. २८ से.) तेव्हा सोमण १ जानेवारी पासून ज्यांचे वर्ष सुरु होते अशा ख्रिस्ती समाजाकरिता पंचांग करतात काय ? असा प्रश्न उद्भविणे साहजिकच आहे.

(३१) दा.कृ.सोमण यांनी पुरोहितांच्या प्राप्तीचा विषय काढून त्यास "अंधश्रद्धेचा पैसा " असे संबोधिले आहे व असा पैसा पचत नाही असेही त्यांच्या 'वैज्ञानिक दृष्टी'स मान्य आहे. विज्ञानाच्या अशा कोणत्या शाखेच्या कोणत्या पुस्तकात असा सिद्धांत सांगितला आहे हे सोमणांनी जरा सांगावे. वर्षानुवर्षे भ्रष्टाचार करणाऱ्या कित्येक राजकारण्यांना, चित्रपट

नायकांना, अभियंत्यांना, डॉक्टर्सना मिळणारा पैसा पचविण्याकरिता हि मंडळी कोणते पाचक घेतात हे सूज्ञ जनतेला आम्ही सांगावयाची आवश्यकता असेल असे वाटत नाही. मंदिरांचे सरकारीकरण करणाऱ्या शासनालाहि त्यांनी हेच सांगावे. कारण, मंदिरात जमणारा पैसा हा भक्ताने देवाकरिता दिलेला असतो. लालबागचा राजा, शिर्डीचे साईबाबा, पंढरपूरचा पांडुरंग, मुंबईचा सिद्धिविनायक, महालक्ष्मी इ. मंदिरात येणारी नोटांची पुडकी, सोन्याचे अलंकार हे कुणीतरी भक्तांनी केलेल्या नवसाचीच फेड असते. म्हणजेच, नवसाला अंधश्रद्धा मानणाऱ्या सोमणांच्या (सोमणांच्याच कशाला सर्वच विज्ञाननिष्ठांच्या ) मते देवळात जमणारा पैसा हा अंधश्रद्धेचाच ठरतो. तो नाकारण्याचे धार्ष्ट्य आधी दाखवा आणि मग असल्या चर्चा करा. सोमणांची पंचांग घेणाऱ्या व्यक्ती ह्या धर्मकृत्यांकरिताच पंचांग घेत असतात. ज्या साळगावकरांनी 'काळसर्प विधी शास्त्रमान्य नाही' या विधानास संमतीदर्शक स्वाक्षरी केली होती त्या साळगावकरांच्या पंचांगात काळसर्प विधी शास्त्रोक्त करवून देणाऱ्यांच्या जाहिराती सुद्धा असतात हे कदाचित सोमणांना माहिती नसावे. ( ज्यांच्याकडे कालनिर्णय पंचांग असेल त्यांनी पहा. डॉ. मनहर सी. देसाई यांच्या जाहिरातीत 'कालसर्पयोग निवारण' असा स्पष्ट उल्लेख आहे.)

(३२) त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या या विधीमधील सर्व पैसा फक्त ब्राह्मणांनाच मिळतो असा समज या 'विचारवंतांनी' करून घेतला आहे. परंतु तीळ,तांदूळ,नारळ,फुले,हजामत करण्याकरता न्हावी,वस्त्रे,उदबत्त्या,कापूर,विड्याची पाने, सुपाऱ्या इ. करिता जो पैसा खर्च होतो तो सर्व काय ब्राह्मणांनाच मिळतो काय ? अनेक कुटुंबे या विधींकरिता श्रम करून कष्टाने उपजीविका करीत आहेत. सरसकट असे विधी बंद करा असे म्हणताना या सर्व माणसांच्या पोटाचे काय ? हा विचार एकाही समाजसेवकाच्या मनात आला नाही ? श्रमिकांनो ! पहा. हीच तुमच्याप्रति या समाजसेवकाना काळजी.

(३३) 'झी २४ तास' वाहिनीने आधी आत्मपरीक्षण करावे. सकाळच्या वेळी ' हनुमान चालीसा कोरलेल्या चमत्कारी यंत्रा' ची जाहिरात अनेक वाहिन्यांवरून केली जाते



पंकज गजानन जोशी.

तेव्हा ते तुमच्या 'सो कॉल्ड' वैज्ञानिक दृष्टीस मान्य असते का ? विविध देवतांच्या चमत्कार वर्णनाचा (भाषांतरित) कार्यक्रम होतो ते तुमच्या 'सो कॉल्ड' वैज्ञानिक दृष्टीस मान्य असते का ? का तुमची सुद्धा 'कट प्रॅक्टिस' चालू असते असे म्हणायचे ?

(३४) 'झी २४ तास' वाहिनीचे एका गोष्टीबाबत मात्र अभिनंदन केले पाहिजे, की हा विधी केवळ ४५०० रुपयात केला जातो असे जाहीर करून IVF सारख्या महागड्या फर्टिलिटी सर्विसेस च्या तुलनेत हा उपाय कोणालाही सहज शक्य आहे हे त्यांनीच ( न सांगता ) सुचविल्यामुळे बरेच झाले. आता जनताच ठरवेल !

(३५) दर महिन्यास शेकड्यांनी येणारी धूतवस्त्रे (साड्या, धोतरे, पंचे इ.) ज्यांना विधी झाल्यानंतर पुरोहितांकडे त्यागिले जाते, ती सर्व वस्त्रे स्वच्छ धुवून मग एकाद्या (वेगवेगळ्या) अनाथाश्रमास दिली जातात. हे सुद्धा समाजकार्यच नव्हे काय ? 'पुरोहित यजमानांना लुटत असतात' अशी कायम पुरोहितविरोधी (खरेतर ब्राह्मणविरोधी) कुप्रसिद्धी करणाऱ्यांना अशा विविध प्रकारांनी व प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता पुरोहितांतर्फे होणारे समाजकार्य दाखविण्यास यांना २४ तासातील काही मिनिटे सुद्धा शक्य न होणे हा सुद्धा चमत्कारच म्हटला पाहिजे.

(३६) उदयजी ! ' ज्याना अशा योगाची माहिती नव्हती अशा नवीन ज्योतिषांना ती माहिती करून देऊन उत्पन्नाचे एक नवे साधन निर्माण करून दिल्याने हि इंडस्ट्री ७०-८०, २००-३०० टक्क्यांनी वाढू शकेल.' असे जकातदारांना म्हणताना आपण हे विसरलात की हीच शंका आपल्या या कार्यक्रमाच्या उद्देशावर पण घेतली जाऊ शकते, नाही का? आपण जनजागृतीचा वसा घेतला आहे ना ? लोक भीतीपोटी नारायण नागबली कालसर्प करतात असे आपण म्हणता तसे 'भाजप'सरकार व 'हिंदू' राष्ट्राच्या भीतीपोटी आपल्यासारख्या वाहिन्या असले कार्यक्रम हेतुपुरःस्सर प्रक्षेपित करता का ?

(३७) हे विधान सूत्रसंचालकांनी केल्यावर जकातदारांना समजून चुकले असेल की, आपण काय उद्देशाने वाक्य उच्चारले होते ?, काय सांगण्याकरिता येथे आलो होतो ? आणि त्यास ऐन सांगतेच्या वेळी स्वरूप कोणते देण्यात आले ? ज्योतिषांनी आता तरी

समजूतदार व्हावे कारण ज्योतिषी व पुरोहित यांच्यातील मतभेदाचा वापर धर्मविरोधी, कर्मकांडविरोधी, ब्राह्मणविरोधी व स्वार्थी मंडळी आपसूकच करून घेतात व आपापले हित साधतात. ज्योतिषी व पुरोहित मात्र व्रतातील कथेच्या सुरवातीला वर्णन केल्याप्रमाणेच राहतात.( 'एका गावात एक दरिद्री ब्राह्मण रहात होता....' )

(३८) मला तर असे वाटते की, या कार्यक्रमाद्वारे केला जाणारा विरोध हा केवळ नारायण नागबली इ. विधींकरिता नसून इ.स.२०१५ मध्ये होणाऱ्या सिंहस्थाकरिता निधी मान्य करण्याच्या प्रक्रियेस केलेल्या विरोधाची पूर्वतयारी आहे. हा निधी मान्य होऊ द्यायचा नाही व महाराष्ट्र-नासिक-त्र्यंबक चा विकास होऊ द्यायचा नाही, देशोदेशीचे भक्त , परदेशातील अभ्यासक येऊन नासिकला, त्र्यंबकला, स्थानिकांना वैश्विक प्रसिद्धी मिळू द्यायची नाही अशा उद्देशाचे हे पहिले पाउल वाटते. त्र्यंबकेश्वर च्या पुरोहितांनी तर संघटित राहून 'सिंहस्थ'पर्वाला सुद्धा अशाच प्रकारे होणाऱ्या विरोधाचे वैचारिक खंडन करण्याकरिता आत्तापासूनच संबंधित संदर्भ, ज्येष्ठ शास्त्री-पंडितांचे मार्गदर्शन, सिंहस्थ'पर्वकाळात आध्यात्मिक उपासकांना आलेले अनुभव, चमत्कार इ.ची माहिती व त्याचबरोबरीने इंटरनेट, वॉट्सअप सारख्या सोशल मिडिया च्या माध्यमातून धर्मजागृती, अधिवक्त्यांचे (वकिलांचे) कायद्यासंबंधात मार्गदर्शन यांच्या संकलनास सुरवात करावी. एका राज्यात आतंकवादी हल्ला झाला तरी देशभरात 'अलर्ट' दिला जातो याप्रमाणे अन्य क्षेत्रातील पुरोहितांनी सुद्धा जागृत राहावे. याचा अवश्य विचार करावा.

(३९) समारोप करताना एवढेच सांगतो की, शिवकालापासून ते शिवसेनाकाळापर्यंत (म्हणजे अजूनपर्यंत अशा अर्थानी) तसेच अडाणी गरिबापासून ते उच्चशिक्षित ( अगदी गायनॅकॉलॉजिस्ट सुद्धा ) व अतिश्रीमंत व्यक्ती सुद्धा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरी येऊन नारायण नागबली व काळसर्पशांती असे विधि ज्यांनी केले आहेत त्यांची नोंद क्षेत्रोपाध्यायांकडे निश्चित आहे हे लक्षात ठेवा. एकाद्याचे कौटुंबिक दुःख, संतती नसल्याचे दुःख असे विविध त्रास दूर करण्याकरिता श्रद्धाळू त्र्यंबकेश्वरी येतात व हे विधी करून शुभफल प्राप्त

करून घेतात. आनंदाने व निष्काम भावनेनी येणारे भक्त सुद्धा असतात परंतु, ते वेगळे धर्मकृत्य करतात. तथाकथित विज्ञाननिष्ठांनी, ज्यांनी नारायण नागबली व काळसर्प विधि केला अशा दुःखी,पिडीत लोकांची माहिती नावासकट जाहीर करण्याची अपेक्षा ठेवणे म्हणजे त्यांचे दुःख , संतती न होणे इ. बद्दल खंत, सल यांचे घृणास्पद व जाहीर प्रदर्शनच करण्यासारखे नव्हे काय ? ज्याप्रमाणे गर्भपात, सोनोग्राफी करणाऱ्यांची नावे जाहीर करणे योग्य नव्हे हे ते जाणतात, 'एडस् चा रुग्ण, शारीरिक अत्याचार झालेली स्त्री अशांची नावे सुद्धा चांगल्या हेतूनेच गुप्त ठेवली जातात. तसेच नारायण नागबली व काळसर्प विधि करणाऱ्या दुःखी, पिडीत भक्तांची नावे जाहीर करणे क्षेत्रोपाध्यायांना सुद्धा मनापासून मान्य नाही. नावे जाहीर करायचीच ठरविली तर अनेक राजकीय नेते, उच्चशिक्षित डॉक्टर्स, इंजिनिअर्स यांच्यासारखी मंडळी, सुप्रसिद्ध ( व कुप्रसिद्धही ) चित्रपट कलावंत यांची नावेसुद्धा प्रसिद्ध करावी लागतील. समाजात व कॅमेऱ्यासमोर जे स्वतःला नास्तिक, विज्ञानवादी म्हणवितात त्यातील बहुतेक लोक वैयक्तिक आयुष्यात अनेक श्रद्धाच नव्हे तर अंधश्रद्धा सुद्धा बाळगून असतात. हिंदी चित्रपटसृष्टीतील एका सुप्रसिद्ध नायकास जेव्हा मोठ्ठा अपघात झाला होता, तेव्हा अशाच एका प्रसिद्ध देवतेस त्याच्या पत्नीने नवस केला होता व हा नायक सुखरूप बरा झाल्यावर तो फेडला सुद्धा होता हे जगजाहीर आहे. जेव्हा संकट येते तेव्हाच खरा उपयोगी कोण आहे ते कळते. नारायण नागबली व काळसर्प विधि यांना थोतांड म्हणताना आपण आपल्या श्रद्धास्थान असलेल्या धर्माचार्यांना, वेदशास्त्रसंपन्न पंडितांना व समाजात प्रसिद्ध असणाऱ्या महापुरुषांना अंधश्रद्ध व थोतांडे ठरवून त्यांचा अपमान करण्याचे महापातक ओढवून घेत आहोत त्याचा परिहार मात्र कोणताही बली अथवा शांती करून होणार नाही एवढे मात्र निश्चित.

या कार्यक्रमाच्या व अशा अनेक लेखांच्या निमित्ताने सत्य काय ते जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न करूच. वाहिन्यांमध्ये हिम्मत असेल तर समर्थन करणारे व विरोध करणारे समान संख्येत बोलावून सर्वांना पुरेसा वेळ द्या व हि तयारी असेल

तरच मग चर्चा घडवा. सहस्र वर्षे चालत असलेल्या व विविध अंगउपांग, पैलू असणाऱ्या विधींच्या खुलाशाकरिता १०- १५ मिनिटे देणे हे हास्यास्पदच आहे. तेव्हा पुन्हा एकदा अशीच चर्चा घडवून आणण्याचे धार्ष्ट्य अशा वाहिन्यांनी अवश्य दाखवावे. नारायण नागबली कालसर्प समर्थक वर्गाने मात्र वाहिन्यांच्या व त्यावरील विचारवंतांच्या अशा चुकीच्या विचारांना योग्य, ससंदर्भ व सुसंस्कृत भाषेतील विचारांनीच सडेतोड प्रत्युत्तर द्यावे, गैर मार्गाचा अवलंब करू नये.

कार्यक्रम संपतासंपता ३१ डिसेंबर, २०१४ रोजी रात्री ९ वा. 'झी २४ तास ' पाहिले तर पुन्हा त्याच भागाचे पुनःप्रसारण दाखवून कर्मकांडविरोधाचे 'गोबेल्स' प्रचारक खरे कोण आहेत हे कोट्यवधी जनतेसमोर सिद्ध केल्याबद्दल झी २४ तास चे आभार !

त्र्यंबकराज सर्वांना धर्माचरणाची सुबुद्धी देवो हीच प्रार्थना !




पंकज रामचंद्र जोशी

pankajjoshiguruji@gmail.com संपर्क :- (022) 24311409